महाराष्ट्र टाइम्स पुणे ,

शनिवार ,२७ ऑगस्ट २०१६

# विसर्जन यंदाही हौदातच

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुण्याचे ग्रामदैवत आणि मानाचा पहिला गणपती असलेल्या कसबा गणपती मंडळाने यंदाही 'श्रीं'चे विसर्जन नदीत न करता हौदात करण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकाधिक नागरिकांनी आणि गणेश मंडळांनी याचे अनुकरण करावे, यासाठी कसबा गणपतीने यामध्ये पुढाकार घेण्याचे ठरविले असल्याचे मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे यांनी सांगितले. नदी तसेच ओढ्यांमध्ये 'श्रीं'च्या मूर्तीचे विसर्जन केल्यास मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होते. ही गोष्ट टाळण्यासाठी कसबा गणपती ट्रस्टने हा निर्णय घेतल्याचे शेटे यांनी स्पष्ट केले.

**कसबा गणपती मंडळाने घेतला निर्णय**

गेल्या वर्षी धरणात कमी प्रमाणात पाणी उपलब्ध असल्याने गणेशोत्सवाच्या काळात नदीला पाणी सोडण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने मानाच्या गणेश मंडळांना नदीत आपल्या बाप्पाचे विसर्जन न करता हौदात करावे, असे आवाहन केले होते. याला सकारात्मक प्रतिसाद देऊन मानाच्या पाच गणपती मंडळांबरोबर श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्ट, अखिल मंडई मंडळाने यात पुढाकार घेतला आणि वेगळा आदर्श घालून दिला होता.

दर वर्षी शहरातील गणेशमंडळे नदील गणपती विसर्जन करत असल्याने मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण होते. गणेशोत्सवानंतर धरणातून पाणी सोडणे बंद केल्यानंतर 'प्लास्टर ऑफ पॅरिस'च्या गणेशमूर्ती पाण्यात विरघळत नसल्याने या मूर्ती तशाच राहतात. या गोष्टींना आळा बसवा यासाठी हौदांमध्ये गणपती विसर्जन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मागील वर्षी प्रमाणे यंदाही कसबा गणपती मंडळा 'श्रीं'चे विसर्जन हौदात करणार असल्याच्या वृत्ताला कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष शेटे यांनी दुजोरा दिला आहे. मानाच्या गणपतींनी हौदात विसर्जन केले असल्याने बाकीच्या मंडळांनीही हौदात विसर्जन करण्याचा निर्णय घेतला होता. ही चळवळ वाढविण्यासाठी कसबा गणपती मंडळ प्रयत्नशील राहणार आहे. यंदाच्या वर्षी हौदाबरोबरच घरगुती 'श्रीं'चे विसर्जन घरच्या घरीच करावे, असे आवाहन शेटे यांनी केले.

### 'विसर्जन हौदातच करा'

२०१४पर्यंत गणेशोत्सवामध्ये सर्वसाधारण ३६ हजार गणेश मूर्तीचे विर्सजन हौदात केले जात होते. मागील वर्षी मानाच्या मंडळांनी यात सहभाग घेऊन आवाहन केल्याने सुमारे २ लाख ९६ हजार घरगुती आणि मंडळांच्या बाप्पाचे विसर्जन हौदात झाले. ही चळवळ वाढविण्यासाठी कसबा गणपती मंडळ प्रयत्नशील राहणार आहे. यंदाच्या वर्षी हौदाबरोबरच घरगुती 'श्रीं'चे विसर्जन घरच्या घरीच करावे, असे आवाहन शेटे यांनी केले.